विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी २०२५.

अधिसूचना

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.

क्रमांक न्यास्थाप-०८२४/७३८/प्र.क्र.२०४/कार्यासन-११.—भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ च्या पोट-कलम (३) तसेच कलम ८ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत, यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत जेथवर पुणे जिल्ह्यातील इंदापूर महसुली तालुक्याशी संबंधित आहेत तेथवर, त्यामध्ये, अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचारविनियम करून, याद्वारे, २५ जानेवारी, २०२५ पासून, पुणे जिल्ह्यातील इंदापूर या महसुली तालुक्यासाठी सत्र उपविभागाची निर्मिती करीत आहे आणि उक्त सत्र विभागाच्या सीमाअंतर्गत उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश पीठासीन अधिकारी असलेल्या सत्र न्यायालयाची इंदापूर येथे स्थापना करीत आहे. प्रमुख सत्र न्यायाधीश, पुणे हे, इंदापूर सत्र उपविभागाचे देखील सत्र न्यायाधीश असतील, आणि त्यास, उक्त सत्र उपविभागाकडील प्रकरणे स्वतः निकाली काढण्याचे किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या इतर कोणत्याही न्यायालयाकडे सोपविण्याचे, अथवा त्यास योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, इंदापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीशाकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

IndiaCode

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास वसंत गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya,Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 16th January, 2025.

NOTIFICATION

BHARTIYA NAGRIK SURAKSHA SANHITA, 2023 .

No. Nyasthap-0824/C.R.204/DESK-11.—In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 7 read with section 8 of the Bhartiya Nagrik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023); in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf ; and in partial modification of all earlier notifications issued in that behalf, in so far as they relate to the revenue tehsil of Indapur in Pune District, the Government of Maharashtra, after consultation with the High Court of Judicature at Bombay, hereby, with effect from 25th January, 2025 creates, a Sessions sub-division for the revenue tahsil of Indapur in Pune District and establishes Court of Sessions at Indapur to be presided over by the Additional Sessions Judge, for trial of cases arising within the limits of the said Sessions sub-division. The Sessions Judge, Pune shall also be the Sessions Judge for the Sessions sub-division at Indapur, and shall have the powers to withdraw unto himself or assign to any other Court of competent jurisdiction, the cases from the said Sessions sub-division, or to assign unto the Additional Sessions Judge at Indapur, any such cases as he thinks fit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor-cum-Joint Secretary
to Government.

IndiaCode